# जिल्हा परिषद अमरावती

## कॅम्प़ रोड, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ अमरावती ४४४ ०२

## दूरध्वनी कमांक - ०७२१ २६६२९२६

ईमेल - ceozp.amravati@maharashtra.gov.in

Websit- www.zpamravati.gov.in


क्रमांक : जिप/मुकाअ/स्विस/२१/२०१७/ दिनांक : २१ मार्च, २०१७

**मार्च अखेरीस कोषागारात पाठवावयाच्या कोषागार देयकांबाबत....**

**परिपत्रक**

शासनाचे विविध मंत्रालयीन विभाग तसेच इतर विभागांकडून जिल्हा परिषदेकडे बी.डी.एस. व्दारे अनुदान प्राप्त होत असते, सदर अनुदान बी.डी.एस. व्दारे प्राप्त झाल्यानंतर कोषागारात देयक सादर करण्यास कार्यालयाकडून विलंब होत असतो. असे निदर्शनास आले आहे की, ब्रीम्स़ प्रणालीव्दारे अनुदान प्राप्त झाल्यानंतर वेळेत बी.डी.एस. न काढल्यामुळे विहीत वेळेत कोषागारात देयक सादर न झाल्याने अनुदान व्यपगत होण्याची शक्यता असते.

आता या परिपत्रकाव्दारे असे कळविण्यात येते की, अनुदान प्राप्त झाल्यानंतर लगेचच तातडीने बी.डी.एस. काढून कोषागारात देयक पाठविण्यासाठी सक्षम अधिका-यांचे स्वाक्षरीने कोषागारात सादर करावे. तसेच ज्या विभागाची देयक कोषागारात पाठविण्यात आलेली आहेत ती देयके मंजुरी करणे, त्रृटयापूर्ण करून फेरसादर करणे इत्यादी कार्यवाही विभागातील जबाबदार कर्मचा-यावर सोपविण्यात यावी. ज्या ठिकाणी मुख्य़ कार्यकारी अधिकारी आहरण व नियंत्रण अधिकारी आहेत अशी देयके तातडीने मुख्य़ कार्यकारी अधिकरी यांचेकडे दिनांक २५ मार्च २०१७ पूर्वी स्वाक्षरीस्तव़ सादर करावीत. अधिक विलंबाने सादर होणा-या देयकावर मुख्य़ कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी होणार नाही याची दक्षता घ्यावी.

KSK

**(डॉ. किरण कुलकर्णी, भाप्रसे)**
**मुख्य़ कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

प्रतिलिपी-

१. अतिरिक्त़ मुख्य़ कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना माहितीस्तव़ अग्रेषित.
२. मुख्य़ लेखा व वित्त़ अधिकारी जिल्हा परिष्द अमरावती यांना पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.
३. सर्व कार्यालय प्रमुख, जिल्हा परिषद अमरावती.
४. आय.टी. कक्ष जि.प. संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी..